**सहकारी संस्थांसाठी कायदा कलम १५६**
**अन्वये वसूली अधिकाऱ्यांची,**
**नियुक्ती / फेरनियुक्तीबाबत**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय**
**जा.क्र.पतसंस्था/स.आ.५/वसूली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१९/७८९**
**दिनांक :- ०४/०४/२०१९**

**वाचावे:-**

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे कडील जा.क्र.पतसंस्था/स.आ.५/ वसूली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२४७४/२०१९ दिनांक ३१/१०/२०१८

**शुध्दीपत्रक:-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत नागरी सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँका, पतसंस्था आणि इतर संस्थांच्या थकीत कर्जदारांचे वसूलीसाठी या कार्यालयाचे जा. क्र. पतसंस्था/स.आ.५/ वसूली अधिकारी नियुक्ती/ फेरनियुक्ती/ २४७४/२०१९ दिनांक ३१/१०/२०१८ अन्वये परिपत्रक निर्गमीत करण्यात आले आहे. त्यामधील मुद्या इ. मधील क्रमांक ४ यामध्ये स्थावर जप्ती (Attachment) करून मालमत्तावर बोजे नोंद करूनही कर्जदाराची कर्ज रक्कम वसूल न झाल्यास सदर स्थावर मालमत्तांची वाजवी किंमत (Upset Price) वसुली अधिकाऱ्याने संबंधित निबंधकांकडून निश्चित करून घ्यावी व सदर मालमत्तेचा लिलाव नियम १०७ मधील तरतुदीनुसार करण्यात यावा. ही कार्यवाही वसुली दाखला मिळाल्यापासून सहा महिन्याच्या आत करण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे .

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन व इतर संस्थांनी या कार्यालयाचे असे निदर्शनास आणले आहे की जिल्हा दंडाधिकारी यांचेकडून मालमत्तेचा ताबा मिळणेसाठी उशीर होत असलेने ६ महिन्यामध्ये सदरची कार्यवाही पुर्ण होवू शकत नाही.

सबब मुद्दा क्र. इ (४) यामधील " ही कार्यवाही वसुली दाखला मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत करावी" ही अट वगळण्यात येत आहे.

**(सतीश सोनी)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत:-

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व
३. तालुका उप/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सर्व

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

Scanned by CamScanner